# छ. शिवाजी कॉलेजमध्ये भारतीय संविधान व राष्ट्रीय एकात्मता जागृती कार्यशाळा

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य, मुलभूत अधिकार, मुलभूत कर्तव्य यावर झाले विचारमंथन

सातारा : येथील रयत शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये राष्ट्रीय छात्रसेना,विवेक वाहिनी,सांस्कृतिक विभाग,मराठी विभाग व इंग्रजी विभाग यांचे संयुक्त विद्यमाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने 'भारतीय संविधान व राष्ट्रीय एकात्मता जागृती कार्यशाळा ' घेण्यात आली.या कार्यशाळेत 'भारतीय संविधान निर्मिती व मुलभूत अधिकार'या विषयावर छत्रपती शिवाजी कॉलेजमधील राज्यशास्त्र विषयाचे प्राध्यापक डॉ.शिवाजी पाटील यांनी माहिती दिली. ते म्हणाले की ''आपल्या कोणत्याही ग्रंथापेक्षा सर्वश्रेष्ठ ग्रंथ हे भारतीय संविधान आहे. बाबासाहेब आंबेडकर यांची विद्वत्ता आणि देशनिष्ठा एवढी होती की संविधान समितीने पहिल्याच बैठकीत हेच संविधान मसुदा समितीचे अध्यक्ष असावेत असा विश्वास सर्वांच्या मनात तयार झाला होता.कोलंबिया विद्यापीठाने त्यांना सिंबॉल ऑफ नॉलेज अशी उपाधी दिली .भारतीय संविधानाने जे मूलभूत हक्क दिले तसे कोणत्याही धर्माने दिलेले नाहीत. भारत एकत्र बांधून ठेवण्याचे काम संविधानाने केले आहे. कलम नंबर १२ ते ३५ पर्यंतचे समानतेचे अधिकार ,समान संधी अधिकार, स्वातंत्र्याचे अधिकार संरक्षण अधिकार ,शिक्षण अधिकार ,शोषणाविरुद्ध चे अधिकार ,धर्म स्वातंत्र्य अधिकार,अल्प संख्याकांचे अधिकार ,जीविताचे रक्षण अधिकार इत्यादीचे विश्लेषण त्यांनी केले.प्राचार्य डॉ.विठ्ठल शिवणकर यांचे मार्गदर्शनाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

दुसऱ्या सत्रात मराठी विभाग प्रमुख व संविधानाचे अभ्यासक प्राध्यापक डॉ. सुभाष वाघमारे यांनी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतीय संविधान निर्मितीतील योगदान आणि भारतीय नागरिकांची कर्तव्ये' या विषयावर सविस्तर विवेचन केले. ते म्हणाले की ''वर्तमान काळात धर्मांधता जाणीवेने पसरवण्याचे काम केले जात आहे.अल्पसंख्याक बहुसंख्यांक तेढ धर्मांच्या आधारे केली जात आहे .यासाठी आपल्या देशाच्या घटनेने भारतीय नागरिकांना काय अधिकार दिलेत हे माहीत करून घेणे आवश्यक आहे .दरेक काळात भारताचे आणि भारतीय नागरिकांचे रक्षण करण्याची जबाबदारी ही तरुण पिढीने घेणे आवश्यक आहे .जबाबदार नागरिकांची निर्मिती शाळा कॉलेजमध्ये असताना केली पाहिजे .प्रत्येकजण हक्काची भाषा करतो पण आपले देशा साठी कायकर्तव्य करायला पाहिजे हे समजून घेतले पाहिजे' असे ते म्हणाले.त्यांनी घटनेच्या कलम ५१ क अंतर्गत असलेली कर्तव्ये सांगितली .धर्म आणि धर्मग्रंथ पेक्षा भारतीय संविधान हे



खूप उन्नत विचार देते असे सांगत त्यांनी 'गीता, बायबल, हो या कुराण, सबसे आगे ही संविधान 'ही घोषणा म्हणून घेतली आणि संविधान हे धर्मापेक्षा कसे उन्नत व पुरोगामी आहे पटवून दिले .याच कार्यशाळेस जोडून संविधानिक हक्कावर आधारित कविता विक्रम खरात याने सादर केली. सदर कार्यशाळा रुसा योजनेंतर्गत घेण्यात आली. या कार्यशाळेत उपप्राचार्य डॉ.अनिलवावरे,उपप्राचार्य डॉ. रोशनआरा शेख,प्रा.गजानन चव्हाण, डॉ. कांचन नलवडे, डॉ.सचिन माने ,प्रा.प्रियांका कुंभार प्रा.रवींद्र महाजन,प्रा. रामचंद्र गाडेकर दशरथ रणदिवे ,तसेच एन.सी.सी ,विवेक वाहिनी ,सांस्कृतिक विभाग व मराठी ,इंग्रजी विभागातील विद्यार्थी व विद्यार्थिनी या कार्यशाळेस सहभागी होते लेफ्टनंट.प्रा.केशव पवार यांनी प्रास्ताविक केले तर आभार डॉ.सचिन माने यांनी मानले. भारतीय संविधानाच्या मार्गाने वाटचाल करण्याचा निर्धार यावेळी सर्वांनी केला.

## प्रार्थना